जगताप, श्री. अनिल वलाखेकर आणि डॉ. माणिक वडळकर यांनी काम पाहिले. सर्धेची अंतिम फेरी २६ आणि २७ ऑक्टोबर २०१५ रोजी यशवंत नाट्यमंदिर येथे संपन्न झाली. अंतिम फेरीमध्ये एकूण १२ एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यातून खालील एकांकिकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

१. प्रथम - 'जून जुलै' - जिराफ थिएटर
२. द्वितीय - 'सेल्फी' - अभिनय, कल्याण.
३. तृतीय - 'द कॉन्शस' - माय माऊली.

अंतिम फेरीसाठी परिक्षक म्हणून श्री. भारत तांडेल, श्रीमती विद्या करंजीकर आणि श्री. हेमंत भालेकर यांनी काम पाहिले. सदर बक्षिसपात्र एकांकिकाही ९६ व्या नाट्य संमेलनात सादर करण्यात आल्या.

दोन्ही एकांकिका स्पर्धांचे आयोजक म्हणून नाट्यपरिषदेतर्फे श्री. शिवाजी शिंदे, श्रीमती गीता सोमण आणि श्री. दिगंबर आगाशे यांनी काम पाहिले.

## पहिले बालनाट्य संमेलन, सोलापूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने या वर्षापासून प्रतिवर्षी अखिल भारतीय मराठी बालनाट्य संमेलन आयोजित करण्याचे ठरविले. या वर्षाच्या पहिल्या बालनाट्य संमेलनाचे आयोजन नाट्यपरिषदेच्या सोलापूर उपनगरीय शाखेला देण्यात आले. पहिले बालनाट्य संमेलन दिनांक २६ ते २९ नोव्हेंबर २०१५ रोजी संमेलनाध्यक्षा सौ. कांचन सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या संपन्न झाले. या संमेलनात बालनाट्य व इतर मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या संमेलनाचे संयोजक निमंत्रक तथा समिती प्रमुख सहकार्यवाह श्री. भाऊसाहेब भोईर आणि समिती सदस्य श्री. सुनिल महाजन, विजय केंकरे, सुनिल ढगे, नाथा चितळे, दिलीप देवरणकर, किशोर आयलवार, सतीश लोटके, दिलीप कोरके आणि कृष्णा जाधव यांनी केले. श्री. कृष्णा जाधव यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

## गरजू रंगकर्मींसाठी आर्थिक मदत

नाट्यपरिषदेने सुरू केलेली गरजू रंगकर्मींना मासिक अनुदान योजना आणि मानधन योजना व्यवस्थित कार्यान्वीत असून त्या अंतर्गत ४१ रंगकर्मींना मासिक अनुदान देण्यात येते. नाट्यपरिषदेतर्फे ५७१ रंगमंच कामगारांचा स्टार हेल्थ अॅण्ड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडतर्फे अॅक्सिडन्ट पॉलिसी शेडुल-ग्रुप या पॉलिसी अंतर्गत विमा उतरविला असून त्याचा संपूर्ण प्रिमियम नाट्य परिषदेने भरला आहे. नाट्य परिषदेतर्फे गरजु रंगकर्मींना वेळोवेळी आर्थिक मदत करण्यात येते. यावर्षी श्री. सुरेश चिखले आणि श्री. विवेक पणशीकर यांना रू. १५०००/- (रूपये पंधरा हजार फक्त) श्री. बाबा पार्सेकर यांच्या अमृत सोहळ्याला रू. ११०००/- (रूपये अकरा हजार फक्त) इतकी आर्थिक मदत देण्यात आली. ज्या रंगमंच कामगारांच्या मुलांना शालांन्त परिक्षेत ६० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत, त्यांच्या पुढील शिक्षणासाठी नाट्य परिषदेतर्फे आर्थिक मदत करण्यात येते.

नाट्य परिषदेतर्फे यावर्षी कु. महेश भरत वर्दम, कु. समीक्षा प्रमोद मुळुक आणि कु. दिपाली किशोर पिंगळे यांना अनुक्रमे रू. १४,७१०/-, १५,०००/- व १५,०००/- इतकी शैक्षणिक मदत करण्यात आली.